महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**अतितात्काळ**

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/ 389 दिनांक : 1 NOV 2022

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर

**विषय** :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या पदविका तसेच व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काबाबत....

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी- पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरू झालेल्या आहेत. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती(अ) (ब) (क),भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या उमेदवारांना संबंधित विभागांमार्फत वेळोवेळी शिष्यवृत्तीसंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करण्यात आली आहे.

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पदविका संस्थांमध्ये तंत्रशिक्षण संचालनालय यांचेमार्फत आणि तांत्रिक व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत करण्यात येणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (CAP ) माध्यमातून प्रवेश प्राप्त होणा-या उमेदवारांना त्यांच्या संवर्गाप्रमाणे शासनामार्फत शैक्षणिक शुल्क रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात अदा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उपरोक्त नमूद उमेदवारांनासुध्दा त्या त्या विभागामार्फत निर्गमित होणा-या शासन निर्णयातील तरतूदीनुसार शिष्यवृत्तीची रक्कम अदा होणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेणा-या उमेदवारांकडून प्रवेशाच्या वेळी संबंधित शासन निर्णयानुसार देय शुल्क आकारण्यात यावे. ही बाब आपल्या अधिनस्त सर्व पदविका, व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणी संस्थांकडून उमेदवारांना प्रवर्गनिहाय अनुज्ञेय शिष्यवृत्ती विचारात न घेता शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित संस्थेविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात यावी व सदर बाबत आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

**( डॉ.अभय वाघ )**
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीकरिता सादर

१. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ३२
२. मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई तसेच मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई
३. सर्व संबंधित संस्था यांना विभागीय कार्यालयामार्फत आवश्यक कार्यवाहीसाठी